डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेतील संचालक गट-अ या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन आदेश क्र. प्रतिनि २०२६/प्र.क्र.१०८/प्रशि-४
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २६ नोव्हेंबर, २०२६

संदर्भ :- १) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/कार्या-१२, दि.१७.१२.२०१६.
२) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.५१०/कार्या-१२, दि.१६.०२.२०१८.
३) संचालक,डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी,अमरावती यांचे पत्र क्र.प्रशा/लेखा/प्रबोधिनी/पदभरती/२८५२/२०२६, दि.१९.०६.२०२६.
४) विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष कार्यकारी समिती डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी,अमरावती यांचे पत्र क्र. कक्ष/लेखा-आस्था/कावि-३२५३/२०२६, दि.२४.०८.२०२६
५) महसूल व वन विभाग शासन आदेश क्र. पदोन्नती-२०२५/प्र.क्र.१३३/आस्था-१ (ई-१८११३५४) दि.०६.११.२०२६.

शासन आदेश :-

डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या राज्य प्रशिक्षण धोरणान्वये घोषित करण्यात आलेल्या विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेत रिक्त असलेल्या संचालक गट-अ (वेतनश्रेणी एस-२५:७८८००-२०९२००) या पदाकरीता प्रतिनियुक्ती धोरणाच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार श्री.श्यामकांत मस्के, अपर जिल्हाधिकारी (गट-अ) (वेतनश्रेणी एस-२५ : ७८८००-२०९२००) यांची खालील तक्त्यात नमूद केल्यानुसार प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येत आहे. :-

अ.क्र.	नाव /पदनाम/वेतनश्रेणी	मुळ प्रशासकीय विभाग	प्रतिनियुक्तीचे पद/ वेतनश्रेणी	प्रतिनियुक्तीचा दिनांक	प्रतिनियुक्तीचा कालावधी
१	श्री.श्यामकांत नामदेवराव मस्के, अपर जिल्हाधिकारी (गट-अ) (एस-२५ : ७८८००-२०९२००)	महसूल व वन विभाग	संचालक गट-अ (एस-२५ : ७८८००-२०९२००)	आदेशाच्या दिनांकापासून	३ वर्षे

२. महसूल व वन विभागाने श्री.श्यामकांत मस्के, अपर जिल्हाधिकारी (गट-अ) यांच्या प्रतिनियुक्तीची नोंद घेवून आवश्यक ती कार्यवाही करावी.

३. सदर प्रतिनियुक्ती महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा....) नियम १९८१ च्या परिशिष्ट-२ मधील पुढील अटी व शर्तींच्या अधीन राहील. :-

१) प्रस्तुत प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी संबंधित विभागास लोकसेवेच्या हिताच्या दृष्टीने सेवेची आवश्यकता वाटल्यास सदर अधिका-यास परत बोलविण्यात येईल. डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी,अमरावती या संस्थेस वरील अधिकाऱ्यांच्या सेवेची आवश्यकता नसल्यास संबंधितांना ३ महिन्याची नोटीस द्यावी लागेल. त्याचप्रमाणे शासनास सदर बाब अवगत करण्यात यावी.

२) प्रतिनियुक्तीवर असतानाच्या कालावधीतील वेतनाचा/रजा वेतनाचा खर्च डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेने करावा.

३) महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा....) नियम १९८१ च्या परिशिष्ट-४ मध्ये विहित केलेल्या दरानुसार डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेकडून रजा वेतन व निवृत्ती वेतन अंशदान देण्यात यावे.

४) सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीमधील वर्गणी चालू ठेवण्यात यावी.

५) संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी करावयाची झाल्यास त्यांच्या सेवा मूळ विभागाकडे परत करण्यात याव्यात.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६११२६११००४५४४०७ असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NAMRATA SHASHANK BHARSAKHALE

Digitally signed by NAMRATA SHASHANK BHARSAKHALE
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=AFC239A04F8765FDFAFF5B427895A52F52390A276568759DF519AEA1257851 2C, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E7A55E217A5A7B81D43819C528413DCC573FB455C923C289F62184B4155ED280, cn=NAMRATA SHASHANK BHARSAKHALE
Date: 2026.11.26 11:01:34 +05'30'

(नम्रता भारसाखळे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र -१/२ मुंबई/नागपूर
२) विभागीय आयुक्त, अमरावती विभाग,
३) उपसचिव (आस्था-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
४) संचालक, डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती
५) निबंधक तथा सहायक प्राध्यापक, डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती.
६) जिल्हा कोषागार अधिकारी, जि.अमरावती
७) सहायक लेखा अधिकारी,डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती
८) श्री.श्यामकांत मस्के, सहायक प्राध्यापक, पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती
९) निवडनस्ती सा.प्र.वि./प्रशि-४.